# रणजित गुहा : भारतीय सबाल्टर्न प्रवाहाचे शास्त्रशुद्ध जनक

**प्रा. डॉ. जगदीश घन:शाम खरात.,**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर,

ता. यावल, जि. जळगाव

ई-मेल : jagdishkharat852@yahoo.com

**Abstract :**

भारतीय इतिहास लेखनामध्ये मार्क्सवादी प्रवाहाने आपले भरीव असे योगदान दिले आहे. या नवतरूण मार्क्सवादी इतिहासकारात प्रामुख्याने दा.ध. कोसंबी, रामशरण शर्मा, रोमिला थापर, बिपिन चंद्रा, इरफान हबीब आदी इतिहासकारांचे अत्यंत प्रभावी असे लेखन योगदान दिले आहे. भारतीय इतिहासात या प्रवाहानेच प्रथमत: क्रांतिकारी स्वरूपात इतिहास विषयाच्या परिघात वस्तुनिष्ठ आणि प्रखरपणे मांडला. या मांडणीमध्ये त्यांनी कोणताही विषय वर्ज्य ठेवला नाही. त्यांनी यामध्ये क्रमश: सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय इत्यादी सर्वच बाबींचा भौतिकवादी धांडोळा घेऊन इतिहासाची व्याप्ती वाढवली आहे. या इतिहास लेखनाने प्रामुख्याने वसाहतवादी आणि त्याचबरोबर राष्ट्रवाद्यांच्या राष्ट्रीय पुरुषांचे चित्रांकण, गौरवीकरण या सारख्या बाबींचा कडाडून बीमोड केला. याबाबतीत ज्येष्ठ मार्क्सवादी इतिहासकार सुमीत सरकार यांनी अशी टिप्पणी दिली. या काळातील राष्ट्रवादी राष्ट्रीय वृत्तीचा संबंध बुद्धिवादाच्या निकषावर घासून पाहिला तर ब्रिटिशांच्या राज्यात नोकऱ्या मिळत नाहीत म्हणून निराश झालेल्या तरुणांचा तडफडाट एवढ्याशीच मर्यादित होता, असे दिसते. त्यांनी अशा प्रकारचे ऐतिहासिक नायकत्व नाकारले आणि नवीन ऐतिहासिक पार्श्वभूमी त्यांनी सिद्ध केली. ही मांडणीच इतिहास लेखनात नवमार्क्सवादी म्हणून पुढे आली.

प्रस्तुत नव मार्क्सवादी म्हणून (Neo Marxist) प्रवाह हाच मुळात मार्क्सच्या ज्या इतिहास, मांडणीतील धारणा किंवा गृहीतके होते, त्यांच्या मर्यादांची मांडणी होता. त्यामुळे त्यांनी मार्क्सवादाच्या काही इतिहासलेखनाच्या त्रुटीही प्रभावीपणे लण्याच्या किंवा त्यावर टीकात्मक मूल्यमापन करण्याच्या अनुषंगाने पुढे आला बाबींची प्रखर भौतिकवादी अशी समीक्षा करीत असला तरीही त्यामध्येही त्यांच्यावर काही लोकोत्तर नेतृत्वांचा, अभिजनवादाचा प्रभाव हा होताच होता. त्यामुळे हा इतिहास कोणत्याही प्रकारे सामाजिक वा सांस्कृतिक असाही पुढे येत नव्हता. याबाबतीत सुमीत सरकार यांनी असे विश्लेषण केले.

इ.स. १९७० पर्यंत आपल्या इतिहास लेखनात सामाजिक इतिहास हा दुर्लक्षितच राहिला' आणि त्यांच्या या विश्लेषणाचा ऐतिहासिक योगायोग असा की या इ.स. १९७० मध्येच या भारतीय इतिहासांच्या क्षितिजावर रणजित गुहाचा प्रयोगशील उदय झाला आणि या इतिहास लेखनामध्ये एका प्रवाहाच्या स्वरूपाने एक नवीन प्रारूप त्यांनी सबाल्टर्न अर्थात वंचितांचा किंवा तळागाळातील लोकांचा इतिहास अशा आशयाने प्रभावीपणे संकल्पनात्मक पातळीवर पुढे केला. या गुहांच्या पूर्वी कोणीच या वंचितांच्या, तळागाळातील लोकांबाबतीत लिहिले असे नाही. यामध्ये नेहरू, डांगे, देसाई आणि डी.डी. कोसंबी यासारख्या इतिहासकारांनी तो मांडला होता. परंतु तो गुहा एवढा प्रभावशाली एककेंद्री नव्हता किंबहुना तो त्या पातळीपर्यंत पोहोचला नाही असे म्हणता येईल.

**Keywords:** वसाहतवादी, गौरवीकरण, राष्ट्रवादी, नवमार्क्सवादी, अभिजनवाद, सामाजिक इतिहास, सबाल्टर्न, प्रभुत्व,

**प्रस्तावना :**

रणजित गुहाचा जन्म २३ मे 1922 रोजी पूर्व बंगालमधील बाकरगंज जिल्ह्यातील सिद्धकर्ती खेड्यात झाला. यांचे मूळ आडनाव गुहा बक्षी असे होते. परंतु पुढे यामध्ये केवळ गुहा एवढेच राहिले. त्यांचे वडील राधिकारंजन गुहा हे वकील होते. पुढे ते ढाका उच्च न्यायालयात न्ययाधीश होते. तर त्यांचे मोठे बंधू देवप्रसाद गुहा हे पाली भाषातज्ज्ञ म्हणून ख्यातकीर्त होते. गुहांचे प्रारंभीचे शिक्षण हे स्थानिक खेड्यातच झाले. ते बंगाली, संस्कृत, इंग्रजी भाषा शिकले. पुढील शिक्षणासाठी ते कलकत्त्यास गेले. इ.स. १९३८ साली मॅट्रिक पास झाले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी कलकत्याच्या प्रेन्सिडेन्सी महाविद्यालयात घेतले. या काळात त्यांच्यावर मार्क्सवादाचा एवढा प्रभाव पडला की त्यांनी कम्युनिस्ट पार्टीत सहभाग घेतला. त्यावेळी त्यांनी इ.स. 1940 मध्ये कलकत्याच्या साम्यवादी तत्वज्ञानावर आधारित Students Cultural Society ही संस्था स्थापन केली. पुढे पदव्युत्तर शिक्षण घेतल्यावर Communist Party of India या संघटनेत सहभागी झाले. आपले मार्क्सवादी विचार आणि कार्यासाठी त्यांनी People War हे वृत्तपत्रही चालवले होते. त्यांच्या कार्याची सर्वात महत्वाची अशी पावती म्हणजे त्यांनी 1947 मध्ये पॅरिस (फ्रान्स) येथे Hard Federation of Democratic Youth या परिषदेत बंगालचे तरूण तेजांकित प्रतिनिधीत्व केले. त्यावेळी ते युरोपात दोन वर्ष राहिले. सबंध युरोप पाहिला ते कलकत्त्यास आले. ही कलाटणी मिळाली ती अशी की त्यांना पोलंडमध्ये मार्था नावाची तरुण मैत्रीण मिळाली आणि त्या दोघांत लवकरच प्रेम होऊन त्यांनी विवाह केला आणि १९५३ मध्ये ते कलकत्त्यास आले.

रणजित गुहांना नोकरीची पहिली संधी १९५०-५९ या वर्षी जाधवपूर विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक झाले. पुढे एका वर्षात १९५४ मध्ये इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी २१ वर्षे अध्यापन केले. यावेळी त्याच्या अभ्यासात अंतोनिओ ग्रामचीचे संघर्षमय जीवन ज्ञात झाले की ग्रामची लहानपणी कुबळा होता. त्याने प्रचलित सरकार विरुद्ध आक्रमक असा पवित्रा घेतला होता. त्यामुळे सरकारने त्यास आजन्म कारावासाची शिक्षा दिली. या कारावासातच त्याने आपले मार्क्सवादी चिंतन मांडले, त्यांना सुरुवातीपासूनच या मार्क्सवादाच्या मांडणीमध्ये काही त्रुटी, उणिवा जाणवत होत्या आणि त्यांनी या सर्व लेखन निबंधाचे सार म्हणजे Prison Notes अर्थात 'तुरुंगातील टिपणे' म्हणून प्रकाशित करण्यात आले. यामध्ये त्यांनी मार्क्सवादाची समस्या' या शिर्षकाखाली स्वतंत्र लेखन केले. आधुनिक राजकुमार यातूनच त्यांनी असाही दीर्घ लेख लिहिला होता. या त्यांच्या लेखनातच त्यांनी Subaltern ही अत्यंत कल्पक संकल्पना मांडली. त्यांनी हा शब्द लष्करी अधिकार सोपानातील निम्नस्तरीय धुरीणत्व नसलेल्या गटांना किंवा वर्गांना लागू केली. यातूनच त्यांनी शोषित, अंकित समूह असाही अर्थ यामधून ध्वनीत केला.[1] हा वैचारिक आकृतिबंध पाळून त्यांनी आपली व्याख्या पुढील प्रकारे विस्तारित केली.

'The Social group and element included in this category represents the demographic difference between the total Indian population and all those when he have described as the elite.'[2]

अर्थात भारतातील पारंपरिक समाजव्यवस्था जी वर्ण व जातिव्यवस्थेला आहे, त्यामध्ये हा दुय्यमांचा, शोषितांचा एक गट सबंध देशात वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येतो. आणि तरीही बऱ्याचदा त्यांची गणना प्रभुत्व या गटात केली जाते. अशा आशयघन स्वरूपात त्यांनी या व्याख्येचे स्पष्टीकरण केले आहे. यावरून असे दिसून येते की, गुहांनी सबाल्टर्न या संकल्पनेतून, प्रामुख्याने या लेखातून आलेला यापूर्वीच्या अभिजनवाद या ऐतिहासीक पातळीवर नाकारला, याबाबत त्यांनी स्पष्ट केले.

'Subaltan provides a new orientation with which many different styles. Interest and discursive had max hand it possible to unit there rejection of academic.'

स्कूल ऑफ आफ्रिकन ॲण्ड एशियन स्टडीज युनिव्हर्सिटी येथे इतिहासाचे प्रोफेसर म्हणून त्यांनी कार्य केले. येथे त्यांच्या सहवासात मार्था हिच्याशी दीर्घ परिचय झाला. ही त्यांची दुसरी पत्नी होय. यानंतर ते ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी कॅनवेरा येथे रिसर्च फेलो म्हणून कार्यरत झाले. या काळातील त्यांचे सर्वात लक्षणीय असे कार्य म्हणजे A rule of property for Bengal (1963) आणि Elementary aspects of peasant insurgency in colonial India असे दोन ग्रंथ लिहिले.

**सबाल्टर्न अर्थात वंचितांच्या लेखनाचे जनकत्व :**

रणजित गुहा यांच्यावर तरुणपणापासूनच मार्क्सवादाचा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी या प्रभावातूनच इतिहासाकडे केवळ पाहिलेच असे नाही तर त्या धाटणीवर हा इतिहास मांडला होता. परंतु जसजसा त्यांचा मार्क्सवादावर अभ्यास वाढत गेला तसतसे त्यांचे या इतिहास मांडणीतून कदापि समाधान होत नव्हते आणि त्यांना व्यक्तिगतरीत्या या इतिहास विश्लेषणाबाबतच्या काही मर्यादा प्रामुख्याने जाणवत होत्या. त्यामुळे त्यांनी एक कृतिशील अशी भूमिका घेतली आणि इ.स. १९८२ मध्ये सबंध भारतीय इतिहासकारांना एकत्र करून त्यांच्याशी विचारविनियमय केला आणि त्यामध्ये त्यांनी 'एक स्वतंत्र नव्या परिघात इतिहास लिहिला जावा' अशी प्रभावी भूमिका घेतली आणि या त्यांच्या विचारांचा एक स्वतंत्र असा परिणाम म्हणजे त्यांनी यामधून 'सबाल्टर्न स्टडी' अर्थात वंचितांच्या वा दुय्यमांचा अभ्यास इतिहास अशी सृजनशील संकल्पना मांडली. त्यांची ही इतिहास विश्लेषण करणारी अशी ही नवसंकल्पना प्रचंड मोठ्या पातळीवर लोकप्रिय पावली आणि इतिहासाच्या विश्लेषणात, आकलनात प्रथमत:च याप्रकारे प्रवाहस्वरूपात दुर्लक्षित, वंचित, दुय्यम घटक प्राधान्यक्रमाने, नायकस्वरूपाने पुढे आले. त्यामुळे भारतीय पृष्ठभूमीवर या सबाल्टर्न लेखन प्रवाहाचे जनकत्व हे रणजित गुहा यांच्याकडे जाते आणि या लेखन प्रवाहाकरिता त्यांनी आपले सबंध जीवनच समर्पित केले आणि सातत्याने त्याचा अर्थ, नवनव्या परिघात मांडत राहिले. त्यांनी यासाठी Subaltan studies यांचे क्रमश: सहा खंड प्रकाशित केले जे नवइतिहासकारांना सदैव प्रेरणादायी ठरतील.

**सबाल्टर्नची मूळ संकल्पना :**

प्रस्तुत सबाल्टर्न या लेखन प्रवाहाचे रणजित गुहा हे जरी प्रवर्तक (जनक) असले तरी या संकल्पनेची मूळ मांडणी प्रसिद्ध इटालियन मार्क्सवादी विचारवंत अंतोनिओ ग्रामची (१८९१-१९३७) यांनी केली होती. हा ग्रामची इटालीमधील मार्क्सवादाचा अत्यंत कृतिशील असा कार्यकर्ता होता. या सबाल्टर्नमध्ये बऱ्याच नवीन बाबी पुढे आल्या आहेत. या भूमिकेने प्रामुख्याने ऐतिहासिक पातळीवरील अभिजनवाद पूर्णतः नाकारला आहे.

**रणजीत गुहांची ग्रंथसंपदा :**

रणजित गुहांनी आपली 'सबाल्टर्न' ची प्रवाहरूपी संकल्पना स्पष्ट करण्यासाठी सबाल्टर्न स्टडीज हे सहा खंडात्मक ग्रंथ संपादन करून या विचारधारेची चौकट तर पक्की केली आहे त्यातून त्यांनी सक्षमरीत्या या प्रवाहाचे प्रमाणभूत अशा प्रकारचे लेखन केले आहे. त्यांची लेखनसंपदा पुढील प्रकारे आहे.

1. A rule of property for Bengal (1963).
2. Elementary aspects of peasant insurgency in colonial India
3. The salt industry of Midnapur (1954).
4. An administrative Blue print of 1885 (1955).
5. The origins of permanent settlement (1956).
6. On trojer and culture (1971).
7. The Mathama and Mob (1973).
8. Review of Elizabeth with camb (1974).
9. Indian Democracy : Long dant, Non worried (1976).
10. The post of counter in emergency (1983).
11. An Indian Historiography of India (1987).
12. Chandra's Death.
13. Subaltern studies Vol. 5 th.

इ.प्रकारे विपुल असे लेखन त्यांनी केले आहे. या त्यांच्या लेखनकार्यावरून त्यांच्या इतिहास व्यासंगाची कल्पना येते. हे लेखन करताना त्यांनी त्या त्या काळातील घटनाक्रम, त्यातील सामाजिक, सांस्कृतिक अनुबंध, दलित, आदिवासी यांची दुय्यम जीवनपद्धती यांची जीवनमूल्ये व क्रांतिकारी चळवळ अशा नव्या आशयघन परिघात त्यांनी हा नवा सृजनशील इतिहास प्रतिपादला आहे. तद्वतच त्यांनी हेही स्पष्ट केले की, असा इतिहास मांडताना मोठ्या समस्या व आव्हाने आहेत. कारण की कुठेच आपणास लिखित स्वरूपात सापडत नाहीत. त्यातून तो आपणास त्या सबंध आजूबाजूला महत्त्वपूर्ण घटनाक्रम, दुय्यमांची जीवनपद्धती, त्यांची भूमिका, त्यांची बोलीभाषा, त्यांची लोकगीते, मौखिक कथा, परंपरांतून शोधून तो इतिहासात मांडावा लागेल, अशी मांडणी केली आहे.

रणजित गुहांनी आपल्या A Rule of property for Bengal यामध्ये त्यांनी बंगालमध्ये जी 1973 मध्ये जी कायमधारा पद्धती लागू करण्यात आली होती. तीचा साक्षेपी आढावा त्यांनी घेतला आहे. यांनी त्याची कारणेही निराळ्या प्रकारे विशद केली, व त्यांच्या मते कायमधारा पद्धत ही सामाजिक व आर्थिक अविचलतेची सनद आहे. असे प्रभावी विवेचन केले.

गुहांचा दुसरा प्रभावी ग्रंथ Elementary aspects of peasant Insurgency in colonial India हा होय, या ग्रंथाच्या प्रस्तावनेतच गुहांनी या संदर्भात प्रभावी अशी मांडणी केली आहे की, शेतकऱ्यांची बंड किंवा उठावाची भुमिकाही वसाहतवादाइतकीच भारतात जुनी आहे. वसाहतवादाचा प्रतिसिद्धांत विरोध म्हणजेच प्रचलित सत्तेविरुद्ध उठाव करण्याची प्रवृत्ती होय, अर्थात यातुन ते इतिहासाला नव्या स्पष्ट व वास्तववादी अशा आवर्तनात मांडतात की, या प्रकारचे उठावाचे प्रतिबिंब चक्राकार गतीचे नसुन एका सरळ रेषेत जाणाऱ्या घडामोडिसारखे असते. अशा प्रकारची मांडणी करुन गुहा हे इतिहासाच्या अशा पारंपरिक मांडणीलाच छेद देतात. आपल्या या नव्या संकल्पनात्मक अभ्यास भुमिकेबाबत गुहा स्पष्ट मत व्यक्त करतात. की, The subaltern studies, therefore, look into the complex layers of the colonical era, these people here not simple expertly awaits and their indigenousness persisted despite the

raptures and discontinuity cassavas by the dominate imperialist development and hummers process.

अर्थात सबाल्टर्न हा प्रवाह वसाहतीक यंत्रणेत गुंतागुंतीच्या स्वरुपात दिसून येतो. हे लोक अर्थातच सामान्य, दुय्यम हे तितकेच साधे नाहीत, त्यांचे दुय्यम अंकितत्व असुनही मुळात अत्यंत सांस्कृतिक पातळीवर गहनता प्राप्त असे लोक असतात. त्यामुळे त्या त्या स्थानिक पातळीवर याचे हेच गुण वा नंतर शोषित त्यांच्याकडून शोषण करून घेतात आणि इतिहास पटलात याचे गडद पडसाद उमटतात. गुहांच्या लेखनाबाबत नोबेल पुरस्कारप्राप्त अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांनी अशी टिपणी दिली की,

Guha work have deeply influenced not only the writing as subcontitental history but also historical investigation else where as well as cultural studies, literatury theories and social analysis across the world.

अर्थात गुहांचे कार्य हे अभिजात इतिहासालाच नाकारते, त्यातील प्रभावी अशी गहनता तितक्या प्रभावाने स्पष्ट करतात. इतकेच नव्हे तर इतिहास संशोधन त्याच बरोबर सांस्कृतिक अध्ययन, साहित्य याचीही त्यांनी अभ्यास करण्याची धाटणीच बदलून त्यांनाही एक नवा आयाम प्रदान केला आहे.[3]

अशा प्रकारे रणजित गुहांनी भारतीय इतिहास लेखनामध्ये ओजस्वी आणि क्रांतिकारी असे कार्य केले आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1. Gramsci Antonio: (1996), Selection from the Prison hate Book, Orient Longman, New Delhi, Page No. 196.
2. Guha Ranjeet (2000), Subaltern Studies, Vol. 1-3, Rajkamal Prakashan, New Delhi, Page No. 08.
3. कदम दिलीप (2020), भारतीय इतिहासातील डी. डी. कोसंबी यांचे योगदान, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 309.